# कारवाईसाठी उभे दोन डंपर पळविले, दोघांवर गुन्हा

■ धुळे । प्रतिनिधी

कुसुंबा (ता. धुळे) येथील ग्राम महसूल कार्यालयाच्या आवारात कारवाईसाठी उभे पाच ब्रास वाळूने भरलेली दोन हायवा (डंपर) वाहने चोरीस गेली आहेत. याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मंडळाधिकारी जितेंद्र भगवान बांगर (रा. सुभाष नगर, जुने धुळे) यांनी धुळे तालुका पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, कुसुंबा येथील ग्राम महसूल कार्यालयाच्या आवारात वाळूसह दोन वाहने कारवाईसाठी उभी होती. या वाहनांमध्ये एमएच-४१ - एव्ही-७७५५ व एमएच-१५-एचएच-९६८० क्रमांकाच्या या दोन्ही हायवा वाहनांत मिळून अंदाजे १० ब्रास गौण खनिज (वाळू) भरलेली होती. मात्र, ही दोन्ही वाहने विशाल दशरथ सोनवणे व राकेश सूर्यवंशी यांनी वाळूसह चोरून नेले. ही घटना दि. ४ मे रोजी पहाटे दोन ते तीन वाजेदरम्यान घडली. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक कृष्णा पाटील हे करीत आहेत.

# जामखेडी प्रकल्पातून ४ गावांसाठी आरक्षित पाणी सोडणार-जिल्हाधिकारी

■ धुळे । प्रतिनिधी

साक्री तालुक्यातील जेबापूर, दापूरा, रोहण, सामोडे या गावांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने या गावातील पाणी टंचाई निवारणार्थ जामखेडी मध्यम प्रकल्पातून १९.२८२ दलघफु इतक्या पाण्याचे आवर्तन सोडण्यात येणार आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी निर्गमित केले आहे.

साक्री तालुक्यातील जेबापूर, दापूरा, रोहण, सामोडे या गावात पाणी टंचाई दिसून येत असल्याने जामखेडी मध्यम प्रकल्पातील आरक्षित असलेले पिण्याचे पाणी सोडणेबाबत विनंती प्रशासनास केली होती. त्यानुसार जामखेडी मध्यम प्रकल्पामधून साक्री तालुक्यातील ४ गावांसाठी १९.२८२ दलघफु पाणी आरक्षित करण्यात आले आहे. या आरक्षित पाण्याचे एकाच आवर्तन सोडण्यात येणार आहे.

पाणी आवर्तन सोडण्यापूर्वी नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांवरील फळ्या काढण्यात याव्यात व पुन्हा पाणी अडविले जाणार नाही, याबाबत कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, धुळे यांनी संनियंत्रण करावे तसेच पाणी अडविले किंवा अनाधिकृत उपसा होणार नाही याबाबत संनियंत्रण तहसिलदार व गट विकास अधिकारी यांनी करावे.

आवश्यक असल्यास पाणी सोडण्यापूर्वीच पोलीस बंदोबस्ताची मागणी करुन नियोजन करावे. पाणी सोडल्यानंतर नागरिकांकडून पाणी अडविणे, चारी / कॅनाल फोडणे, विद्युत पंपाद्वारे पाणी गळती करणे या सारख्या अनुचित प्रकार न होण्यासाठी पोलीस विभागाने गस्ती वाहनाने वेळोवेळी भेटी द्याव्यात.

धरणातील पाणी साक्री तालुक्यातील गावांपर्यंत घेऊन जाण्याची जबाबदारी संबधित ग्रामपंचायत, तहसिलदार, उपअभियंता ग्रा.पा.पु.वि. पंचायत समिती, उपअभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, पोलीस निरीक्षक, उपअभियंता पाटबंधारे विभाग व तलाठी/ ग्रामसेवक यांची संयुक्तीकरित्या राहील. पाणीपट्टीची रक्कम कार्यकारी अभियंता, ग्रा. पा.पु.विभाग, जिल्हा परिषद यांनी पाटबंधारे विभागास जमा करुन घेवून त्यानंतरच पाणी सोडण्याची कार्यवाही करावी. असेही जिल्हाधिकारी श्री.पापळकर यांनी आदेशात म्हटले आहे.



# रावेर तालुक्यात आधार डीबीटी शिबिरांचे आयोजन

■ रावेर । प्रतिनिधी -

संजय गांधी, श्रावणबाळ, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ, राष्ट्रीय विधवा व दिव्यांग योजना या केंद्र व राज्य शासनाच्या सामाजिक लाभाच्या योजनांतर्गत लाभार्थ्यांचे आधार डीबीटी (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) व व्हेरिफिकेशन काम रावेर तहसील कार्यालयात सुरू आहे. यासाठी नागरिकांना तहसील कार्यालयात यावे लागत होते. त्यामुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचावा, या उद्देशाने रावेर तालुक्यातील विविध गावांमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

आ. अमोल जावळे यांच्या सूचनेनुसार ही शिबिरे गावातच आयोजित करण्यात येत असून,यात सबंधित गावांना मध्ये शिबीर लावली जाणार आहे. त्या ठिकाणी लाभार्थ्यांनी आपल्या मूळ कागदपत्रांसह आधारकार्ड, बँक पासबुक, संबंधित बँक खात्याशी लिंक असलेला मोबाईल घेवून सकाळी ८ ते १० या वेळेत उपस्थित राहावे.

या शिबिरांची सुरुवात ५ मे रोजी चिनावल गावातून झाली असून, ७ मे रोजी पुन्हा चिनावल, १० रोजी ऐनपूर, १४ मे रोजी केऱ्हाळे बु., १५ मे ला खानापूर, १६ मे खिर्डी, १९ मे निमभोरा बु., २१ मे पाल, २२ व २३ मे रोजी सावदा, २६ मे विवरे बु. व २८ मे रोजी वाघोदा बु. येथे शिबिरे होणार आहेत.

रावेर शहर व परिसरातील लाभार्थ्यांनी तहसील कार्यालयात थेट उपस्थित राहून आधार व्हेरीफिकेशन प्रक्रिया पूर्ण करावी. अन्य गावांतील लाभार्थ्यांनी संबंधित तारखेला शिबिरात उपस्थित राहण्याचे व अधिक माहितीसाठी संबंधित तलाठी किंवा कोतवाल यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन तहसील कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# बेटावदसह परिसरात वादळी वाऱ्यासह गारपीट

■ बेटावद । वार्ताहर

शिंदखेडा तालुक्यातील बेटावदसह परिसरात काल (४ मे) मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. काही वेळातच गारपीटही झाली.

गारांचा मारा इतका तीव्र होता की, अनेक पत्र्याच्या घरांवर मोठा आवाज येत होता. या गारपिटीमुळे शेतातील उभी पिके आडवी झाली आहेत. विशेषतः आंबा, कांदा व मका पिकांचे नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. अचानक बदललेल्या हवामानामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काही दिवस हवामान खात्याने सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# पहूरकरांची तहान भागवणाऱ्या गोगडी प्रकल्पात ३० टक्के जलसाठा

■ पहूर, ता. जामनेर । रविंद्र लाठे -



पहूरकरांची तहान भागविणाऱ्या गोगडी प्रकल्पात एप्रिल महिन्याच्या अखेरीस अवघा ३० टक्के जलसाठा शिल्लक राहिल्याने येणाऱ्या काळात टंचाईच्या झळा टाळण्यासाठी नियोजनाची गरज निर्माण झाली आहे. दिवसेंदिवस वाढत जाणारी लोकसंख्या, वाढते तापमान आणि वाढत्या तापमानामुळे पाण्याच्या बाष्पीभवनाचा वाढलेला वेग यामुळे देवळी - प्रकल्प -गोगडी प्रकल्प कोरडेठाक पडण्याच्या मार्गावर आहेत. गोगडी प्रकल्प पहूरकरांसाठी वरदान आहे. पहूर पेठ - पहूर कसबे या दोन्ही गावांना पाणीपुरवठा याच प्रकल्पातून होतो. यंदाही पर्जन्यवृष्टी चांगली झाल्याने प्रकल्प १००% भरलेला होता. परंतु दिवसेंदिवस पहूर गावाची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्याचप्रमाणे तापमानातही दिवसेंदिवस वाढ होत असल्याने जलाशयातील पाण्याच्या बाष्पीभवनाचा वेग वाढलेला असल्याने मोठ्या प्रमाणात जलसाठा आटत चाललेला आहे.

**नियोजनाची गरज** - संभाव्य पाणीटंचाईला आळा घालण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे.

**नळांना तोट्या बसवा** - पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर बऱ्याच ग्रामस्थांकडे पाणीपुरवठ्याच्या नळांना तोट्या लावलेल्या नसतात. यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. भर उन्हाळ्यात पाण्याचा अपव्यय टाळावा .पाणी भरून झाल्यानंतर आपल्या नळांना स्वतः हून तोट्या बसवून घ्याव्यात असे आवाहन सुज्ञ नागरिकांमधून करण्यात येत आहे करण्यात येत आहे.

**जलवाहिन्यांची दुरुस्ती** - नवनाथ नगर तसेच बस स्थानक परिसरात सुरेश मेडिकल जवळ फुटलेल्या जलवाहिन्यातून पाणी वाहून जात असल्याने पाण्याचा उपयोग होतो आहे . या फुटलेल्या जलवाहिन्यांची दुरुस्ती गरजेची आहे.


## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात (टप्पा - २)

**प. रा. हायस्कूल सोसायटी, धरणगांव, ता. धरणगांव, जि. जळगांव संचालित**

प. रा. हायस्कूल, धरणगांव, ता. धरणगांव व कला, वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय (ज्युनिअर कॉलेज), धरणगांव येथे शिक्षण सेवक या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहेत.

संस्था कोड- 270307SC013

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील — मान्य दि: ०५/०५/२०२५

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदानाचा प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शै. पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET / CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Marathi | Graduate Teacher Std (9-10) | Consolidated Pay GT 9-10 (18000) | Aided | Mathematics-science | Marathi | Graduation | Graduation | - | |
| २ | Marathi | Higher Secondary Teacher | Consolidated Pay - High Sec (20000) | Aided | Biology | English | Post Graduation | Graduation | - | |

आरक्षण तपशील - ई. डब्लू. एस. - ०१, खुला - ०१

सर्वसाधारण सूचना: १) पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या उमेदवारांनी https://mahateacherrecruitment.org.in या संकेत स्थळावर अर्ज करावा.

२) अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी -२०२२ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2022.mahateacherrecruitment.org.in) या संकेत स्थळावर माहिती नोंदवून स्व-प्रमाणित केलेली आहे असेच उमेदवार जाहिरातीनुसार अर्ज करू शकतील.

३) सदर भरती प्रक्रिया पवित्र पोर्टलवर दिलेल्या सूचना व नियमांच्या आधारे करण्यात येईल, तसेच पवित्र पोर्टलवर दिलेल्या अटी व नियम सर्व उमेदवारांसाठी बंधनकारक असतील.

टीप - वरील रिक्त पदांसाठी पवित्र प्राणलीमार्फत शासनाकडून उमेदवारांची नावे कळवली जाणार आहेत, त्यामुळे प्रत्यक्ष संस्थेकडे कोणीही अर्ज करू नये.

सही
डॉ. मिलिंद शिशुपाल डहाळे (सचिव)

सही
डॉ. अरुण कृष्णाजी कुळकर्णी (अध्यक्ष)

प. रा. हायस्कूल सोसायटी, धरणगांव, ता. धरणगांव, जि. जळगांव




# संकटं शिकवतात जीवनाचं खरं तत्त्वज्ञान - श्री रसराज प्रभूजी

■ पाचोरा । प्रतिनिधी

येथील श्री जगन्नाथ इस्कॉन मंदिर, पाचोरा यांच्या वतीने भगवद्‌गीता साप्ताहिक सत्संगाचे भव्य आयोजन रविवार, ४ मे रोजी करण्यात आले होते. संध्याकाळी ६ ते ८.३० या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात कीर्तन, प्रवचन व महाप्रसादाचा भाविकांनी उत्स्फूर्त लाभ व सहभाग घेतला. या विशेष सत्संगामध्ये इस्कॉन दिल्ली येथील प्रसिद्ध प्रवचनकार एच.जी. रसराज प्रभू यांचे स्फूर्तिदायक प्रवचन झाले. त्यांचा संदेश भक्तिमार्ग आणि भगवद्गीतेतील तत्त्वज्ञानाचे जीवनाशी असलेले अविस्मरणीय संबंध सांगणारा होता. रसराज प्रभू म्हणाले, जीवनातील प्रत्येक व्यक्तीला दुःख, संकोच आणि संकटं येतात, पण प्रत्येक संकटामध्ये एक शिकवण आहे. भगवद्गीतेत श्रीकृष्ण म्हणतात की मजीवितातली प्रत्येक गोष्ट क्षणभंगुर आहे, आणि जेव्हा तुम्ही या सत्याला समजून स्वीकारता, तेव्हा तुम्ही आतून शांती अनुभवू लागता.असे रसराज प्रभुंनी सांगितले. रसराज प्रभूंनी प्रवचनात हेही सांगितले की, शरीराच्या कक्षेतील जीवनातील प्रत्येक टप्प्याचा उद्देश हाच आहे की, तुम्ही तुमच्या आत्म्याला ओळखा आणि भक्ती मार्गावर दृढ राहा.

# मुलांवर तलवारी उगारुन जिवे मारण्याची धमकीप्रकरणी चार जणांविरुध्द गुन्हा दाखल

■ अमळनेर। प्रतिनिधी

तालुक्यातील गलवाडे खु. येथे मुलांवर तलवारी उगारून जीवे मारण्याची धमकी दिल्याने चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्याकडून चार तलवारी जप्त करण्यात आल्या आहेत. फिर्यादी निखिल रतीलाल पाटील (रा. गलवाडे) हा ३ रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास गावाबाहेर क्रिकेट ग्राऊंडवर खेळत असताना शेखर शेषराव पाटील याने मैदानावर बैलगाडी आणली. मुलांनी त्याचा जाब विचारला असता गाडीत बसलेले चंद्रशेखर शेषराव पाटील, दीपक नारायण पाटील, तेजस नामदेव पाटील (तिघे रा. गलवाडे खू.), उमाकांत दगडू भदाणे (रा. भोकरवाडी ता.जि. धुळे ) हे गाडीखाली उतरले व गोणीत ठेवलेल्या तलवारी काढून चंद्रशेखर याने फिर्यादीवर उगारली. तेव्हा त्याने तलवार हाताने अडवल्याने उजव्या हाताला जखम झाली आहे. तसेच त्यांनी फिर्यादी व त्याच्या लहान भावाला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीच्या काकाने त्या ठिकाणी येऊन त्याच्याकडून चार ही तलवारी घेऊन मारवड पोलिस ठाण्यात जमा केल्या आहेत. चारही जणांविरूद्ध विनापरवाना शस्त्र बाळगणे व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास हे.कॉ. मुकेश साळुंखे हे करीत आहेत.

# मोंढाळे पिंप्री विद्यालयाचा १२वी कला शाखेचा १०० टक्के निकाल

■ पारोळा। प्रतिनिधी -

येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक मोंढाळे पिंप्री विद्यालयाचा इयत्ता बारावी कला शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून एकूण ३३ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते पैकी ३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये प्रथम क्रमांक कु. किरण छोटू भिल्ल ७०.६७, द्वितीय क्रमांक कु. निकिता रवींद्र पाटील ४ ६८.५०,द्वितीय क्रमांक कु. मयुरी अनिल पाटील ६८.५०, तृतीय क्रमांक चि. भावेश शरद बागुले ६७.१७ टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे.

## कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १७-०३ २०२५ २२-०३-२०२५ | ५५८ ८२ ७७८ | २४४ ०१ २९० | ५७९ १४ ३४७ | १२० ३३ ७८८ | १६० ७० ६७७ | ८८० ६६ २७७ |
| १७-०३ २०२५ २२-०३-२०२५ | १११ ३३ १३९ | ६७७ ०० ३३४ | ४७० १० ५५० | ८९० ७९ २८९ | २५७ ३४ १५५ | २३४ ९६ ५५६ |
| ३१-०१ २०२५ ०५-०१-२०२५ | १२८ १२ ३३६ | ४६० ०४ ३५६ | ८८० ६६ ३६७ | १७८ ६१ ५६० | १६९ ६२ १३८ | २३५ ०२ ६७९ |
| ०७-०४ २०२५ १२-०४-२०२५ | १८० ९१ ५८८ | २४७ ३६ २६८ | ७८९ ४४ २३९ | २७७ ६३ ६७० | ३४५ २३ २३८ | ४६९ ९३ ६८९ |
| १४-०४ २०२५ १९-०४-२०२५ | २५७ ४० ३८९ | २७० ९६ २६८ | १६९ ६२ ५७० | ५५८ ८० २२६ | ४८९ १५ १६८ | ३५९ ७६ २४० |
| २१-०४ २०२५ २६-०४-२०२५ | २४७ ३५ ५०० | ४६९ ९१ ३३५ | १४९ ४४ २४८ | २९९ ०८ ४५९ | ४९० ३४ ७८९ | २५७ ४६ २६८ |
| २८-०४ २०२५ ०३-०५-२०२५ | ७८९ ४३ २५६ | १२८ १४ १६७ | ३४५ २५ १६८ | १५० ६९ १८० | १३६ ०५ १५९ | १२७ ०० ५६९ |
| २८-०४ २०२५ ०३-०५-२०२५ | १३५ ९८ ११६ | | | | | |

## मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७-०३ २०२५ २२-०३-२०२५ | १२० ३६ ११४ | ५७९ १२ ५८९ | ३८८ ९५ १७७ | १३८ २८ ४७७ | ३५९ ७९ १२६ | ५८८ १३ ६७० | ● |
| १७-०३ २०२५ २२-०३-२०२५ | १३८ २८ २६० | ७८८ ३७ २५० | ३४६ ३८ १७० | १६० ७१ ३८० | १४८ ३४ ३५६ | १४५ ०३ ६७० | ● |
| ३१-०१ २०२५ ०५-०१-२०२५ | ४५५ ४५ १५९ | ६७० ३६ ३६७ | २३६ १९ ४६९ | ६८८ २६ ४४८ | ८८९ ५४ ३५६ | १२० ३४ ५९० | ● |
| ०७-०४ २०२५ १२-०४-२०२५ | ३६६ ५१ २९० | २४७ ३१ ११९ | १५० ६१ ४८९ | १४९ ४० ४७९ | ४४६ ४२ ११० | १६९ ६६ ११४ | ● |
| १४-०४ २०२५ १९-०४-२०२५ | ६६७ ९७ ३७७ | १८० ९२ २४६ | ३४७ ४४ १५८ | १५७ ३८ ४५९ | ४५० ९१ १३७ | ५५७ ७२ ५८९ | ● |
| २१-०४ २०२५ २६-०४-२०२५ | २०० २६ ८९९ | ५९० ४१ २४५ | १२८ १७ २७८ | २३७ २० ५७८ | १३४ ८५ २३० | २८९ ९० १३६ | ● |
| २८-०४ २०२५ ०३-०५-२०२५ | २३८ ३३ ३४६ | १७० ८६ २४० | ४४४ २५ १६८ | ३८९ ०३ २३८ | १७९ ७४ ६९९ | ● | ● |
| २८-०४ २०२५ ०३-०५-२०२५ | १३५ ९९ ३७९ | | | | | | ● |

## मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| ४६७ ७७ २६९ | ११३ ५१ ३८० | ५५८ ८२ १५६ | ४४० ८९ २७० | ४५६ ५५ ४५६ | १२५ ८५ १६८ |
| २९९ ०२ ३४५ | १९९ ९० ३७० | ११२ ४६ ३४९ | १३८ २१ ५६० | ३४५ २३ १३९ | ११६ ८८ ३५० |
| २४७ ३७ १७९ | ६९० ५१ १३७ | ३३७ ३३ २४७ | १२० ३७ ४४९ | २०० २३ २४७ | २६० ८४ २३९ |
| २८० ०९ २३४ | ८८० ६५ ६९० | ४५७ ६१ ३८० | १२९ २५ ६९० | ८८० ६४ १५८ | ५९० ४५ १७७ |
| ३६९ ८० ३३४ | ५६८ ९३ १५७ | १६० ७६ २६८ | १७० ८७ १६० | २४४ ०७ १६० | २४० ६२ ५७० |
| १४५ ०५ १६८ | २४६ २८ १८९ | ६८० ४४ १६७ | १५६ २७ १६० | २३५ ०५ ६९० | १२६ ९४ १४९ |
| २३९ ४५ १७७ | २८० ०५ ७८० | १५८ ४७ १३३ | १५९ ५१ ६७८ | ६६८ ०५ १४० | २३४ ९६ २४० |
| | | | | | |

रविवार ०४/०५/२०२५
मेन बाजार -
मिलन ना.-

सोमवार ०५/०५/२०२५
मेन बाजार -
कल्याण-१३५-९८-११६
मिलन डे -१३५-९९-३७९
मिलन ना.-


## क्लासिफाईड

### पाहिजेत

हेअर कटींग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहीजेत. न्हावी समाजाच्या गरिब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीक पासुन ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यन्त मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवनाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहणाऱ्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

### खरेदी विक्री

जळगाव शहर परिसरात व जिल्ह्यात, प्लॉट, शेत, फ्लॅट, दुकान, घर, बंगला इ. खरेदी विक्रीसाठी व भाड्याने देणे घेण्यासाठी विश्वासनीय ठिकाण स्वामीकृपा ईस्टेट ब्रोकर जळगाव. आमच्याकडे सुंदर लोकेशन व दर्जेदार क्वॉलिटीचे बांधकाम असलेले गच्चीताबा बंगलोज, स्वस्त भावाच्या, जिरायत, बागायत, रोडटच, एन.ए. झोन शेतजमिनी विकणे आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

### दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२६)(CRINV-2425JL/CRG00504)

### १००% व्यसनमुक्ती

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी.डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२,www.drpalve nashamuktikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही. एम./०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00503)

### उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकून गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो.नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही. एम./ ०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00505)

### देशदूत

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/- प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. 'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

### सूचना

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.